पुणे महानगर

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune Metropolitan Region Development Authority, Pune**

४ था मजला, नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पिंपरी - चिंचवड, पुणे ४११०४४

4th floor, New Administration Building, Opp Akurdi Railway Station, Pimpri-Chinchwad, Pune 411044.

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 /फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email:comm@pmrda.gov.in

जा.क्र. पीएमआरडीए/वि.प./आ.चि.वि./२३-२४/ 3969 दिनांक : १३ /०७/२०२३

## कार्यालयीन आदेश

**विषय:-** प्राधिकरण हद्दीतील गावांमध्ये आकाश चिन्ह बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक परवानगी धोरणाचे अंमलबजावणी बाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणेची स्थापना शासन अधिसूचना दिनांक ३१.३.२०१५ अन्वये झालेली असून दिनांक १९.११.२०१५ च्या प्राधिकरणाच्या बैठकीतील विषय क्रमांक १३/४ नुसार पुणे महानगर क्षेत्रासाठी आकाश चिन्ह धोरण राबविणेकामी प्रारूप तयार करण्यास पुढीलप्रमाणे ठराव मान्य झालेला आहे.

"पुणे महानगर प्रदेश क्षेत्रासाठी Sky Sign (आकाश चिन्ह परवाना) धोरण राबविणे व त्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या मान्य धोरणाप्रमाणे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्राचे प्रारूप तयार करून त्याची अंमलबजावणी करणेस मान्यता देण्यात आली आहे."

त्यास अनुसरून तसेच, प्राधिकरणाचे क्षेत्रासाठी लागू असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०१८ मधील विनियम क्रमांक २९ अन्वये प्राप्त अधिकारात महानगर आयुक्तांचे मान्यतेने नियम / धोरण तयार करण्यात आले असून त्याच्या अंमलबजावणीसाठी खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश:-**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये आकाशचिन्ह, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक इत्यादीसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये तसेच प्राधिकरण क्षेत्रासाठी लागू असलेल्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०१८ मधील विनियम क्रमांक १९ अन्वये विकास परवानगी घेणे बंधनकारक असून त्याची कार्यपद्धती खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

१) आकाश चिन्ह परवाना घेणेकामी अर्जदाराकडून खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

| अ.क्र. | खाजगी/ शासकीय जमिनीवर परवाना घेणेकामी कागदपत्रे |
|---|---|
| १ | अर्ज विहित नमुन्यात |
| २ | वास्तुविशारद यांनी तयार केलेला फलक उभारण्याचा जागेचा नकाशा (site plan / location plan) |
| ३ | संबंधित जागा मालकाचे संमतीपत्र (रुपये १००/- चे स्टॅम्पवर नोटराईज फोटोसह) |
| ४ | अर्जदाराचे हमीपत्र (रुपये १००/- चे स्टॅम्पवर नोटराईज फोटोसह) |
| ५ | स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी रिपोर्ट नकाशासह (स्ट्रक्टरल इंजिनियर यांचे स्टॅबिलिटी रिपोर्ट) |
| ६ | जागा भाड्याने घेतलेली असल्यास भाडे करारनामा, सातबारा उता-यासह (सातबारा उतारा अलीकडील सहा महिन्याच्या कालावधीतील असावा) |

| | |
|---|---|
| ७ | संबंधित जागेचा मोजणी नकाशा अथवा वास्तुविशारदाने केलेला नकाशा, जागेचा फोटो उपग्रह छायाचित्र (Geo tagging सह.) |
| ८ | इलेक्ट्रिक लाईन जात असल्यास संबंधित विभागाचे ना हरकत दाखला. |

२) जाहिरात फलकाचे प्रस्तावासाठी छाननी शुल्क रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) लागू राहील.

**३) आकाश चिन्ह परवानगीकरीता आकारावयाचे जाहिरात शुल्क दर खालीलप्रमाणे :-**

| **अ.क्र.** | **क्षेत्र** | **जाहिरात शुल्क दर रुपये प्रति चौरस फूट प्रति वर्ष** |
|---|---|---|
| १ | प्राधिकरण क्षेत्रामधून जाणारे संपूर्ण लांबीचे द्रुतगती मार्ग, राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग या रस्त्यांवरील आकाशचिन्ह. | रुपये ७०/- (रुपये सत्तर फक्त) |
| २ | वरील एक व्यतिरिक्त पुणे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतिम हदी पासून दहा किलोमीटर पर्यंत (परिघस्त क्षेत्र) | रुपये ६०/- (रुपये साठ फक्त) |
| ३ | वरील एक व दोन व्यतिरिक्त उर्वरित पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये | रुपये ५०/- (रुपये पन्नास फक्त) |

**४) आकाश चिन्ह परवानगी प्रकरणी आकारावयाचे विकास शुल्क -**

आकाशचिन्हास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये परवानगी देणे अपेक्षित असल्याने उक्त अधिनियमाच्या कलम १२४ अन्वये विकास शुल्क आकारणे बंधनकारक आहे. तसेच विकास नियंत्रण नियमावली, २०१८ मधील नियम क्रमांक १७ (६) (i) नुसार स्कायसाईन्स आणि होर्डिंग करिता खालील प्रमाणे (वाणिज्य वापर विचारात घेऊन) विकास शुल्क आकारण्यात यावे.

अ) ज्या खुल्या जागेत आकाश चिन्हाचे फलक उभारावयाचे आहे अशा जागेतील फलकाकरिता लागणा-या एकूण जागेस सभोवताली अंदाजे दहा फूट अतिरिक्त जागा विचारात घेऊन येणाऱ्या क्षेत्रावर विकास शुल्क आकारण्यात यावे.

आ) असे आकाश चिन्ह पेंटिंग स्वरूपात भितीवर किंवा भिंतसदृश इमारतीवर असल्यास आकाश चिन्हाचे एकूण क्षेत्रफळावर विकास शुल्क आकारण्यात यावे.

५) जाहिरात फलकाच्या प्रस्तावासाठी प्राधिकरणाकडील मान्यता प्राप्त परवानाधारक अभियंता अथवा नोंदणीकृत वास्तुविशारद यांचे कडून नकाशे तयार करणे बंधनकारक राहील.

६) जाहिरात फलकासाठी स्ट्रक्चरल डिझायनर चे प्रमाणपत्र दर २ वर्षांनी घेणे आवश्यक आहे.

७) जाहिरात फलकाचा परवाना हा दर २ वर्षांनी नूतनीकरण करून घेणे आवश्यक राहील. नूतनीकरण करतेवेळी वरील (३) मध्ये नमूद केलेनुसार जाहिरात शुल्क तसेच वरील (४) मध्ये नमूद केलेनुसार विकास शुल्क आकारण्यात येईल.

८) आकाश चिन्ह बाबत होडिंग वर क्यूआर कोड, परवानगी क्रमांक, मंजुरीनुसार वैधता कालावधी, इत्यादी ठळकपणे दिसेल अशा रितीने नमूद करण्यात यावे.

९) आकाशचिन्हाबाबत शासनाच्या अन्य (उदा. सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पोलीस विभाग इ.) कोणत्याही विभागाने हरकत घेतल्यास त्याबाबतचे निराकरण अर्जदार यांनी परस्पर करणे बंधनकारक राहील. त्याची कोणत्याही प्रकारची भरपाई अगर तोषिश प्राधिकरणास लागणार नसल्याची व अशा परिस्थितीत सदरची उभारणी तात्काळ काढून टाकणे संबंधितावर बंधनकारक राहील, असे हमीपत्र अर्जदाराकडून घेण्यात यावे.

१०) जागेवर विनापरवाना जाहिरात फलक असल्यास त्याच्या नियमीतीकरणासाठी वरील शुल्कांव्यतिरिक्त विकास शुल्काच्या दुप्पट तडजोड शुल्क म्हणून आकारणी करण्यात येईल.

११) <u>विनापरवानगी/अनधिकृत आकाशचिन्ह संदर्भात करावयाची कारवाई. :-</u>

आकाश चिन्ह संदर्भात कोणतेही प्रकारची अनधिकृत उभारणी अथवा विकास अथवा बांधकाम निदर्शनास आल्यास किंवा आणले गेल्यास अशा सर्व प्रकारच्या अनधिकृत बांधकामांवर अनधिकृत विकासावर / बांधकामांवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार आवश्यक कारवाई प्राधिकरणाच्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाने त्वरित करावी.

१२) कोणतेही आकाश चिन्ह उभारताना अथवा त्यानंतर त्या संबंधाने होणाऱ्या कोणत्याही अपघात तसेच त्यामुळे होणाऱ्या जीवित व वित्तहानीसाठी संबंधित अर्जदार/मालक, परवानाधारक अभियंता अथवा नोंदणीकृत वास्तुविशारद, स्ट्रक्चरल डिझायनर हे पूर्णपणे जबाबदार राहतील. त्याची तोषिश प्राधिकरणास लागणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र परवानगी वेळी घेण्यात यावे.

(राहुल महिवाल)
महानगर आयुक्त
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

१३/६/२३

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-**

१) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक.
२) अतिरिक्त महानगर आयुक्त, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
३) महानगर नियोजनकार, विकास परवानगी विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
४) सह आयुक्त, अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
५) सह आयुक्त, जमीन व मालमत्ता विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
६) सह आयुक्त, प्रशासन विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
७) मुख्य अभियंता, अभियांत्रिक विभाग -१, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
८) मुख्य अभियंता, अभियांत्रिक विभाग -२, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
९) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

पुणे महानगर

## Pune metropolitan Region Development Authority, Pune

४ था मजला, नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पिंपरी -चिंचवड, पुणे 41104

4th floor, New Administration Building, Opp Akurdi Railway Station, Pimpri-Chinchwad Pune 411044.

Ph No.: 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email:comm@pmrda.gov.in


जा. क्र: पीएमआरडीए/वि.प/आ.चि.वि/२०२४-२५/१०६९९ दि.२४/०२/२०२५

## कार्यालयीन आदेश

**विषय :-** प्राधिकरण हद्दीतील गावांमध्ये आकाशचिन्ह बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक परवानगी धोरणाचे अंमलबजावणी बाबत.

**संदर्भ :-** कार्यालयीन आदेश जा.क्र./पीएमआरडीए/वि.प./आ.चि.वि/२३-२४/३१७१, दि. १३/०७/२०२३.

महोदय,

संदर्भिय कार्यालयीन आदेशानुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये आकाशचिन्ह, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक इत्यादीसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये तसेच प्राधिकरण क्षेत्रासाठी लागू असलेल्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०१८ मधील विनियम क्रमांक १९ अन्वये विकास परवानगी घेणे बंधनकारक असून त्याची कार्यपद्धती खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.

आता त्यामध्ये उक्त प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीमध्ये खालील प्रमाणे मुद्दा क्र. (१३) दाखल करण्यात येत आहे.

मुद्दा क्र. (१३) :- (१३) प्राधिकरणाकडुन नवीन जाहिरात फलकास विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र प्राप्त केलेनंतर जागेवर त्याप्रमाणे विकास काम पुर्ण झालेनंतर लागू विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०१८ विनिमय क्र. ७.४ अन्वये पूर्णत्वाचा दाखला अर्जदार व संबंधति संचरना अभियंता (Structural Engineer) यांचेमार्फत Structural Stability प्रमाणपत्रासह प्राधिकरणास सादर करण्यात यावा. व तद्नंतर उक्त अधिनियमाचे कलम ७.५ अन्वये भोगवटा प्रमाणपत्र (प्रत्यक्ष फलक वापर प्रमाणपत्र) प्राप्त करुन घेऊन जाहिरात फलकाचा वापर अनुज्ञेय राहील.

सदरचे आदेश आजपासुन अंमलात येतील.

डॉ. योगेश म्हसे (भा.प्र.से)
महानगर आयुक्त
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे.

**प्रत :-**

१) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक.

२) अतिरिक्त महानगर आयुक्त पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

कृ.मा.पाहा

३) संचालक, नगररचना, विकास परवानगी विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

४) सह आयुक्त, अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

५) सह आयुक्त, जमीन व मालमत्ता विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

६) सह आयुक्त, प्रशासन विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

७) मुख्य अभियंता, अभियांत्रिक विभाग – १, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

८) मुख्य अभियंता, अभियांत्रिक विभाग -२, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

९) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune metropolitan Region Development Authority,Pune**

पुणे महानगर

**४ था मजला, नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वेस्टेशनजवळ, पिंपरी - चिंचवड, पुणे४११०४४**

4th floor, New Administration Building, Opp Akurdi Railway Station, Pimpri-Chinchwad, Pune

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email:comm@pmrda.gov.in

जा.क्र./पीएमआरडीए/वि.प/आ.चि.वि/२०२४-२५/ ८७३ दि २९/०४/२०२५

## कार्यालयीन आदेश

**विषय :-** प्राधिकरण हद्दीतील गावांमध्ये आकाशचिन्ह बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक परवानगी धोरणाचे अंमलबजावणी बाबत.

**संदर्भ :-** १) कार्यालयीन आदेश जा.क्र./पीएमआरडीए/वि.प./आ.चि.वि/२३-२४/३१७१, दि. १३/०७/२०२३.

२) कार्यालयीन आदेश जा.क्र./पीएमआरडीए/वि.प./आ.चि.वि/२४-२५/१०६९९, दि. २४/०२/२०२५.

संदर्भिय क्र. (१) च्या कार्यालयीन आदेशानुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये आकाशचिन्हे, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक इत्यादीसाठी परवाना देणेबाबत प्राधिकरणाचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

यापूर्वी संदर्भ क्र. (२) अन्वये त्यामध्ये मुद्दा क्र. (१३) नव्याने समाविष्ट केलेला असून आता त्यातील मुद्दा क्र. (७) मध्ये पुढीलप्रमाणे बदल व दुरुस्ती करण्यात येत आहे. तरी उपरोक्त संदर्भ क्र. (१) मधील मुद्दा क्र. (७) ऐवजी पुढीलप्रमाणे विचारात घेऊन कार्यवाही करावी.

मुद्दा क्र. (७) :-

**आ) जाहिरात फलकाचा परवाना संपूष्टात आल्यानंतर त्याचे नूतनीकरण करून घेणे आवश्यक राहील. तसेच पूर्वमंजुरी वेळी विकास शुल्क वसूल केले असल्यास नूतनीकरण करतेवेळी केवळ प्राधिकरणाने त्या-त्या वेळी निश्चित केलेल्या प्रचलित दरानुसार जाहिरात शुल्काची आकारणी करण्यात यावी.**

**ब) पूर्वमंजूर जाहिरात फलकाच्या ठिकाणी दुसरा जाहिरात फलक उभारणी करावयाचे असल्यास त्याच्या परवान्या करिता आवश्यक व नियमित लागू सर्व शुल्क वसूल करून घेण्यात यावेत.**

सदरचे आदेश आजपासुन अंमलात येतील.

डॉ. योगेश म्हसे (भा.प्र.से)
महानगर आयुक्त,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**प्रत :-**

१) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे स्वीय सहाय्यक
२) अतिरिक्त महानगर आयुक्त, पु.म.प्र.वि.प्रा. पुणे.
३) संचालक, नगररचना, विकास परवानगी विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
४) सह आयुक्त, अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे
५) सह आयुक्त, जमीन व मालमत्ता विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
६) सह आयुक्त, प्रशासन विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
७) मुख्य अभियंता, अभियांत्रिक विभाग - 1, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
८) मुख्य अभियंता, अभियांत्रिक विभाग - 2, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
९) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

Pune metropolitan Region Development Authority,Pune

पुणे महानगर

४ था मजला, नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वेस्टेशनजवळ, पिंपरी - चिंचवड, पुणे४११०४४

4th floor, New Administration Building, Opp Akurdi Railway Station, Pimpri-Chinchwad, Pune

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email:comm@pmrda.gov.in


जा.क्र./पीएमआरडीए/वि.प/आ.चि.वि/२०२५-२६/१५१२ दि.२३/०५/२०२५

## कार्यालयीन आदेश

**विषय** :- प्राधिकरण हद्दीतील गावांमध्ये आकाश चिन्ह बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक इत्यादीबाबत परवानगी धोरणाचे अंमलबजावणी बाबत.

**संदर्भ** :- १) प्राधिकरणाचे कार्यालयीन आदेश क्र. पीएमआरडीए/वि.प./आ.चि.वि./२३-२४-३१७१, दि.१३/०७/२०२३.

२) प्राधिकरणाचे कार्यालयीन आदेश क्र. पीएमआरडीए/वि.प./आ.चि.वि./२०२४-२५/१०६९९, दि.२४/०२/२०२५.

३) प्राधिकरणाचे कार्यालयीन आदेश क्र. पीएमआरडीए/वि.प./आ.चि.वि./२०२४-२५/७७३, दि.२९/०४/२०२५.

संदर्भिय क्र. १ च्या कार्यालयीन आदेशानुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये आकाशचिन्ह, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक इत्यादीसाठी परवाना देणेबाबत प्राधिकरणाचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. तसेच, संदर्भित क्र. २ व ३ च्या कार्यालयीन आदेशान्वये संदर्भित क्र. १ अन्वये निश्चित केलेल्या धोरण / आदेशामध्ये बदल / दुरुस्ती करण्यात आली असून, त्यानुसार आकाशचिन्ह बोर्ड (जाहीरात फलक) परवाना देणेबाबतची कार्यवाही करण्यात येते.

आता, संदर्भित क्र. १ च्या आदेशातील मुद्दा क्र. १० हा विनापरवाना जाहीरात फलकांकरिता आकारावयाच्या तडजोड शुल्काबाबत असून, सदर आदेशाद्वारे आकाशचिन्ह बोर्ड(जाहीरात फलक) करिता तडजोड शुल्क हे विकास शुल्क इतके करण्यात येत असून संदर्भित क्र. १ च्या आदेशातील मुद्दा क्र. १० पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा.

*"जागेवर विनापरवाना जाहिरात फलक असल्यास त्याच्या नियमितीकरणासाठी विकास शुल्क इतके तडजोड शुल्क आकारणी करण्यात येईल."*

तसेच, यापूर्वी आकाशचिन्ह बोर्ड(जाहीरात फलक) परवाना बाबतच्या प्रकरणांमध्ये तडजोड शुल्क बाबतची भरणा न केलेली चलने रद्द करणेबाबतची कार्यवाही लेखा व वित्त विभागाने करावी. या आदेशानुसार सुधारित चलन निर्गमित करावे.

सदरचे आदेश आजपासुन अंमलात येतील.

**(डॉ. योगेश म्हसे)**(भा.प्र.से)
महानगर आयुक्त,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

प्रत :-

1) महानगर आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक, पु.म.प्र.वि.प्रा. पुणे.
2) अति. महानगर आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक, पु.म.प्र.वि.प्रा. पुणे.
3) संचालक, विकास परवानगी व नियोजन, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
4) सह आयुक्त, अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

5) वित्तिय नियंत्रक, लेखा व वित्त विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.
6) सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune metropolitan Region Development Authority,Pune**

पुणे महानगर

**४ था मजला, नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वेस्टेशनजवळ, पिंपरी - चिंचवड, पुणे४११०४४**

4th floor, New Administration Building, Opp Akurdi Railway Station, Pimpri-Chinchwad, Pune

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email:comm@pmrda.gov.in


जा.क्र./पीएमआरडीए/वि.प/आ.चि.वि/२०२५-२६/ २१८५ दि.१७/०६/२०२५

## कार्यालयीन आदेश

**विषय** :- प्राधिकरण हद्दीतील गावांमध्ये आकाश चिन्ह बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक इत्यादी परवानगीबाबत.

**संदर्भ** :- मा. उच्च न्यायालयातील दावा क्र. ७२१७/२०२५ मधील दि. १०/०६/२०२५ रोजीचे आदेश.

प्राधिकरण हद्दीतील गावांमध्ये आकाश चिन्ह बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक बाबत वादी Reflection Publicity तर्फे श्री. महेश शिवाजी पानके व इतर यांनी महाराष्ट्र शासन तर्फे नगर विकास विभाग व इतर यांच्या विरुद्ध मा. उच्च न्यायालयात दावा क्र. ७२१७/२०२५ दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये दि. १०/०६/२०२५ रोजी मा. उच्च न्यायालयाने आदेश पारित केलेले आहेत. सदर आदेशानुसार वादी यांचेकडून प्राधिकरणाकडे आकाश चिन्ह बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक इत्यादी बाबत प्राप्त असलेल्या अर्जावर १५ दिवसांत निर्णय घेणे बंधनकारक आहे.

तसेच, वादी यांचेकडून आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांमध्ये आकाश चिन्ह बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक इत्यादी परवानगीबाबत दाखल होणाऱ्या प्रस्तावांवर प्रस्ताव दाखल केलेल्या दिनांकापासून १५ दिवसांत निर्णय घेणे बंधनकारक आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या दि. १०/०६/२०२५ रोजीच्या आदेशाचे अवमान होणार नाही, यासाठी सर्वांनी आदेशातील कालमर्यादेत कार्यवाही करावी.

सोबतः १) मा.उच्च न्यायालयीन आदेशाची प्रत.
२) वादी यांच्या नावांची यादी.

(मा.संचालक, विकास परवानगी व नियोजन विभाग यांचे मान्यतेने)

उपमहानगर नियोजनकार
विकास परवानगी विभाग,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे यांचेकरिता.

प्रत :-

1) महानगर आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक, पु.म.प्र.वि.प्रा. पुणे.
2) अति. महानगर आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक, पु.म.प्र.वि.प्रा. पुणे.
3) सर्व अधिकारी / कर्मचारी, विकास परवानगी विभाग, पु.म.प्र.वि.प्रा.पुणे.